# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 327/2022 दिनांक : 24.08.2022

## 1)घरफोडी :–

**1)रामतिर्थ :–** दिनांक 13.08.2022 रोजी 18.00 वा. ते दिनांक 16.08.2022 रोजी 09.00 वा. चे दरम्यान, **फायनान्स स्मुर्ती कार्यालय, नरसी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयांनी ऑफीसचे गेटचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून ऑफीस मध्ये रॅकमध्ये ठेवलेले सिंगर कंपनीचे शिलाई मशिनचे चार मुंडके (मशीन) किंमती 8,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी नागेश सुभाषराव हमंद, वय 32 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. कोंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 133/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2476 पठाण, मो.क्रं. 9823027725** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 23.08.2022 रोजी 00.06 वा. चे सुमारास, **दत्तनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हि तिच्या बहिणीकडे कामानिमित्त मस्तानपुरा येथे गेले असता रात्र झाल्याने तिथे मुक्काम करुन सकाळी मुलासह मोटार सायकल ने घरी परत आली असता घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून कपाटातील दागीने व नगदी असा एकुण किंमती 1,10,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सुनिता संजय हावळे, वय 51 वर्षे, व्यवसाय अंगनवाडी सेविका रा. दत्तनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 310/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रोडे, मो.क्रं. 9158807759** हे करीत आहेत.

**3)हदगाव :–** दिनांक 22.08.2022 रोजी 22.00 वा. ते दिनांक 23.08.2022 रोजी 00.30 वा. चे दरम्यान, **रुई ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे नातेवाईक जेवण करुन आपले घरात झोपले असता अनोळखी दोन चोरटयांनी घराचा कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून झोपलेल्या नातेवाईकाचे गळयातील सोन्याचे मनीमंगळसुत्र व गावातील सोन्या चांदीचे दागिने व नगदी असा एकुण किंमती 99,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर तुकाराम कदम, वय 35 वर्षे, रा. रुई ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरन 264/2022 कलम 457,380,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मोरे, मो.क्रं. 9763457266** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 14.08.2022 रोजी 03.30 वा. चे सुमारास, **व्यंकटेश ज्वेलर्स समोर छत्रपती चौक, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची मो.सा. क्रं. एम.एच./26–ए.डी.–6528 किंमती 20,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी विजय नागोराव जाधव, वय 19 वर्षे, व्यवसाय फायनान्स रा. लाठी खु. ता. कंधार जि. नांदेड ह.मु. छत्रपती चौकी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 300/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2309 जाधव, मो.क्रं. 9049343095** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 13.08.2022 रोजी 22.00 वा. दिनांक 14.08.2022 रोजी 07.00 वा. चे दरम्यान, **अखतर शेख यांचे घरासमोर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर कंपनीची मो.सा. क्रं. एम.एच./26–यु.–9321 किंमती 10,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी चंद्रशेखर भिमराव सोनकांबळे, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कैलास नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 298/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1076 सय्यद, मो.क्रं. 9834849924** हे करीत आहेत.

## 3)बॅटरी चोरी :–

**मुखेड :–** दिनांक 21.08.2022 रोजी 15.00 वा. ते दिनांक 23.08.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **भवानी मंदीर मुखेड, ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे लोडींग अॅटो क्रं. एम.एच./26–बी.डी.–2157 ची बॅटरी किंमती 5,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी रमेश रामदास तरटे, वय 35 वर्षे, व्यवसाय भांडी विक्री रा. भवानी मंदीर गल्ली मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 256/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/400 धोंडगे, मो.क्रं. 8805957400 हे करीत आहेत.

CS Scanned with CamScanner

## 4)विवाहीतेचा छळ :—

**अर्धापूर** :— सन 2021 ते आज पावेतो, **वटफळी ता. हिमायतनगर जि. नांदेड ह.मु. बेलसर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस उपाशी पोटी ठेवून शिवागाळ करुन जिवे मारण्याची धमकी देवून दुकानासाठी तीन लाख रुपये घेवून ये म्हणुन तिचा शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे फिर्यादी 22 वर्षीय महिला यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 245/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/आणेबाईनवाड, मो.क्रं. 7038518183** हे करीत आहेत.

## 5)जुगार :—

**1)नांदेड ग्रामीण** :— दिनांक 23.08.2022 रोजी 18.45 वा. चे सुमारास, **मुदखेड ते वाजेगाव चौकी कडे येणारे रोडवर बालाजी पाटील यांचे कॉम्पलेक्स जवळील मोकळया जागेत, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2470/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोका/1073 विश्वनाथ देवीदास पवार, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं 513/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/616 चक्रधर, मो.क्र. 7020448411** हे करीत आहेत.

**2)अर्धापूर** :— दिनांक 23.08.2022 रोजी 15.15 वा. चे सुमारास, **मालेगाव येथील बाबा टी हाऊस समोरील सार्वजनिक रोडवर मालेगाव शिवार ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 570/—रुपये नगदी व 12000/—रुपयाचा मोबाईल असा एकुण 12,570/—रुपायाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मोहम्मद तय्यब मोहम्मद अब्बास, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 246/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1279 चव्हाण, मो.क्र. 9356283717** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

Scanned with CamScanner